# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई-४००००१.

PH:2264 1150,2 264 1151, 22620601, 22690602, FAX:2692102

E-Mail : mcm.dte@ gmail.com Website: http://www.dte.org.in


क्रमांकः १०/अल्पसंख्यांक/प्रवेश/२०११/७६१

दिनांकः- १६.०९.२०११

## अधिसूचना

विषयः- प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका प्रवेश २०११-२०१२

शासकीय तंत्रनिकेतनामध्ये अल्पसंख्यांकासाठी विशेष प्रवेश फेरी

शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून खालील शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये अल्पसंख्यांकासाठी खालील शाखांमध्ये दुसरी पाळी सुरु करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र शासनाने मुस्लीम, बौध्द, शिख, ख्रिश्चन, पारशी, जैन या समुदायाला अल्पसंख्यांक म्हणून घोषित केलेले आहे. सदर तंत्रनिकेतनांमध्ये वरील समुदायाच्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी ७० टक्के जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत तसेच खुला प्रवर्ग व राखीव प्रवर्ग यामधील विद्यार्थ्यांसाठी ३० टक्के जागा राखून ठेवण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र. | संस्था | शाखा | प्रवेशक्षमता |
|---|---|---|---|
| १. | शासकीय मुद्रण तंत्रसंस्था, जे.जे. स्कूल ऑफ आर्किटेक्चर कॅम्पस, मुंबई (D- 3006) | प्रिंटिंग टेक्नॉलॉजी | ६० |
| २. | शासकीय तंत्रनिकेतन, ४९, अलियावर जंग मार्ग, खेरवाडी, वांद्रे(पु.),मुंबई (D- 3007 ) | संगणक अभियांत्रिकी<br>माहिती तंत्रज्ञान | ६०<br>६० |
| ३. | शासकीय तंत्रनिकेतन, फडकेपाडा, भारत गीयर्स समोर, मुंब्रा शिळ रोड, ठाणे (D- 3011) | यंत्र अभियांत्रिकी<br>स्थापत्य अभियांत्रिकी | ६०<br>६० |
| ४. | शासकीय तंत्रनिकेतन, अक्कलकोट रोड, सोलापूर (D- 6017) | यंत्र अभियांत्रिकी<br>स्थापत्य अभियांत्रिकी | ६०<br>६० |
| ५. | शासकीय तंत्रनिकेतन, धामणगाव रोड, यवतमाळ (D- 1012 ) | यंत्र अभियांत्रिकी<br>स्थापत्य अभियांत्रिकी | ६०<br>६० |
| ६. | शासकीय तंत्रनिकेतन, वीर सावरकर मार्ग, बाबा नगर, नांदेड (D- 2017) | यंत्र अभियांत्रिकी<br>स्थापत्य अभियांत्रिकी | ६०<br>६० |
| ७. | शासकीय तंत्रनिकेतन, एशियन हायवे नं ४६ जवळ, जळगाव (D-2008 ) | यंत्र अभियांत्रिकी<br>स्थापत्य अभियांत्रिकी | ६०<br>६० |

वरील संस्थांमधील प्रवेश राज्यस्तरावर समुपदेशन पध्दतीने दिनांक २०/९/२०११ रोजी सकाळी १०.३० वाजंता घेण्यात येतील.

- शासकीय तंत्रनिकेतन, ठाणे, शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई व शासकीय मुद्रण तंत्र संस्था, मुंबई या संस्थांचे प्रवेश शासकीय तंत्रनिकेतन, बांद्रा, मुंबई येथे होतील.
- शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर, यवतमाळ, नांदेड व जळगाव या संस्थांचे प्रवेश त्या त्या संस्थांमध्ये होतील. सदर प्रवेशासाठी अंतिम गुणवत्ता यादीतील सर्व विद्यार्थी पात्र रहातील. ज्या विद्यार्थ्यांनी इतर संस्थांमध्ये प्रवेश घेतला असेल अशा विद्यार्थ्यांना प्रवेश नियम २०११-१२ पुस्तिकेतील नियम क्रमांक १७.३ मधील मुद्या क्रमांक २ नुसार फी परतावा मिळेल.
- ज्या विद्यार्थ्यांनी शासकीय, अशासकीय व अनुदानित संस्थांमध्ये प्रवेश घेतलेला आहे असे विद्यार्थी देखील या प्रवेश फेरीसाठी पात्र रहातील व त्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येईल.
- ज्या विद्यार्थ्यांना या प्रवेश फेरीमध्ये प्रवेश मिळेल अशा विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेल्या संस्थेमध्ये तीन दिवसाचे आत मूळ कागदपत्रे, गुणपत्रिका, आवश्यक ते शैक्षणिक शुल्क इ. जमा करावे/कागदपत्रे फी पडताळणीसाठी सादर करावीत. तसेच संबंधित संस्थांनी देखील विद्यार्थ्यांचे प्रवेश तात्काळ रद्य करुन कागदपत्रे परत करावीत व फी परताव्याची कार्यवाही करावी.
- इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी संबंधित संस्थेमध्ये दिनांक २०/९/२०११ रोजी सकाळी १०.३० वाजता उपस्थित रहावे. सोबत १० वीची गुणपत्रिका व रु.१०००/- शैक्षणिक शुल्क घेऊन यावे. तसेच यापूर्वी इतर संस्थेमध्ये प्रवेश घेतला असल्यास फी भरलेली पावती/बोनाफाईड सर्टीफिकेट/प्रवेश घेतल्याचा कोणताही पुरावा सोबत आणवा.
- दिनांक २०/९/२०११ रोजी सकाळी १०.३० ते २ या वेळेमध्ये अल्पसंख्यांकाच्या जागा गुणवत्तेनुसार संबंधित समुदायाला देण्यात येतील. तसेच जर संबंधित समुदायाचा विद्यार्थी उपलब्ध झाला नाही तर दुपारी ३ वाजल्यापासून उर्वरीत जागा इतर अल्पसंख्यांक समुदायातील विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार देण्यात येतील.
- सदर प्रवेश फेरी नंतर रिक्त राहिलेल्या जागांसाठी प्रवेश फेरी दिनांक २३/९/२०११ रोजी सकाळी १०.३० वाजता घेण्यात येईल. विद्यार्थ्यांनी संबंधित संस्थांमध्ये यासाठी उपस्थित रहावे. या फेरीसाठी सर्व जागा सर्वसाधारण समजण्यात येतील.
- सर्व शासकीय, अनुदानित संस्थांनी या फेरीमुळे रिक्त राहिलेल्या जागांचे प्रवेश समुपदेशन पध्दतीने दिनांक २८/९/२०११ पूर्वी संस्थास्तरावर पूर्ण करावेत.
- प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका प्रवेशाची मुदत दिनांक २८/९/२०११ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे. सर्व विना अनुदानित संस्थांनी त्यांचे प्रवेश दिनांक २८/९/२०११ पर्यंत पूर्ण करावे व विद्यार्थ्यांची माहिती दिनांक ३०/९/२०११ पर्यंत अपलोड करावी.
- अधिक माहितीसाठी www.dte.org.in/poly 2011 या संकेतस्थळाला भेट द्यावी.

-सही-
(डॉ. सुभाष महाजन)
प्र. संचालक तंत्र शिक्षण,म.रा. मुंबई

पृष्ठांकन क्र. विकाऔ/शिक्षण/२०११/६६५२
दि. 19 SEP 2011

सर्व शासकीय, खाजगी विना अनुदानित तंत्रनिकेतनांसाठी माहितीस्तव आवश्यक कार्यवाहीस्तव.

सहसंचालक (प्रशासन)
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
औरंगाबाद.